# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१** **दि. १३ जुलै, २०२१**

**(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)**

------------------------------------------------------

जळगाव दि.१३ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव जिल्हा क्रीडा विभाग, नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव आणि व्ही.एस.नाईक महाविद्यालय, रावेर यांच्या संयुक्त विद्यमाने ऑलम्पिक जागरण उपक्रमाचे आयोजन १५ ते २० जुलै या दरम्यान करण्यात आले असून गुरुवारी या उपक्रमाचे उदघाटन प्रभारी कुलगुरु प्रा.ई.वायुनंदन यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीन होणार आहे.

टोकियो येथे होणाऱ्या ऑलम्पिक स्पर्धेत सहभागी भारतीय खेळाडूंना शुभेच्छा व प्रोत्साहन मिळावे याकरीता हा उपक्रम राबविला जात आहे. या ऑनलाईन उपक्रमाचे उदघाटन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु प्रा.ई.वायुनंदन हे गुरुवारी सकाळी ८ वाजता करणार असून प्रभारी कुलसचिव डॉ.एस.आर.भादलीकर उपस्थित राहणार आहेत. हा उपक्रम दि.१५ ते २० जुलै कालावधीत सकाळी ८ ते १० या वेळेत ऑनलाईन झूम ॲप आणि यूटयुब लाईव्हवर आयोजित केला आहे. या उपक्रमात विविध क्रीडा प्रकारातील माजी ऑलम्पिक खेळाडू व आतंरराष्ट्रीय खेळाडू मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमात सहभागी व्यक्तींनी माहिती भरुन आपले प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावयाचे आहे. या कार्यकमाची लिंक प्राप्त करुन घेण्यासाठी प्रा.उमेश पाटील (मोबाईल नंबर ९७३०६२३४९७) व प्रा.सुभाष वानखेडे (मोबाईल नंबर ८६०५७०४५३५) या व्हॉटस ॲप ग्रुपवर नोंदणी करावी असे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी कळविले आहे.

---------------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी